**प्रेस नोट** **दिनांक ०७/०३/२०१९**

## चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## फ्लिपकार्ट चे गोडावुनमधुन चोरी करणारे आरोपीस अटक

चंदननगर पो.स्टे. चे श्री. बळवंत सावळाराम कांबळे, रा. बी-७/३१, अतुरनगर, उंड्री, पुणे-६० हे इस्टाकार्ट सर्व्हिसेस प्रा.लि., गणेशनगर, वडगावशेरी, पुणे या कंपनीचे शाखा व्यवस्थापक आहेत. त्यांचे फ्लिपकार्ट चे गोडावुनमधुन ग्राहकांना ईलेक्ट्रीक वस्तुंची घरपोच सेवा दिली जाते. दिनांक ११/१०/२०१८ ते दिनांक ०५/११/२०१८ रोजीचे दरम्यान दिपावली सणानिमीत्ताने त्यांचे गोडावुनमध्ये मोठयाप्रमाणात वस्तु आलेल्या होत्या. त्या संधीचा फायदा घेवुन त्याठिकाणी काम करणारे आरोपी नामे **(१)** ऋषीकेश अरूण ढावरे, वय २१ वर्षे, रा. स.नं. १२, न्यु लक्ष्मीनगर, भिमज्योत मित्रमंडळ, येरवडा, पुणे **(२)** प्रशांत बाबु कांबळे वय २३ वर्षे रा. स.न.१२, लक्ष्मीनगर येरवडा पुणे यांनी गोडावुनमधील रु. २,४०,४८३/- चे १५ मोबाईल, १ कॅमेरा व १ घडयाळ असा ऐवज संगणकामध्ये नोंद न करता चोरुन नेलेला आहे. बाबत चंदननगर पो.स्टे. गु.र.नं. ५८/२०१९ भा.द.वी कलम ३८१,३४ असा दाखल आहे.

सदर गुन्हयाच्या तपासाबाबत वरिष्ठांचे सुचनांप्रमाणे पोहवा. ३७८४, अजित धुमाळ, पोना. २९९४, तुषार भिवरकर, पोशि. ८३१७ सुभाष आव्हाड, पोना. ६७४२, अमोल गायकवाड, पोना. १७०४, अण्णा माने यांनी तपास करीत असतांना आरोपी क्रं. १ चे मोबाईल क्रमांकावरुन त्याचे सीडीआर व एसडीआर काढले असता तो त्याचे मुळगावी मु.पो. उजनी, ता. टेंभुर्णी, जि. सोलापुर येथे असलेची माहिती मिळालेने त्याचे गावी जावुन त्यास ताब्यात घेवुन त्यास अटक केली. त्याचेकडे तपासामध्ये त्याने वरील क्रं. २ आरोपीचे नाव व पत्ता सांगितला असता आरोपी क्रं. २ यासही अटक केली आहे. दोन्ही आरोपींकडुन एकुण रु. १,३६,९०५/- चे ९ वेगवेगळया कंपन्यांचे मोबाईल हॅंडसेट जप्त करण्यात आलेले आहेत.

सदरची चांगली कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग श्री. सुनिल फुलारी सो, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४, श्री अक्कानवरू सो, सहा पोलीस आयुक्त येरवडा विभाग डॉ. श्री. शिवाजी पवार सो. यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. राजेंद्र मुळीक, वपोनि. कृष्णा इंदलकर, पो.नि.गुन्हे - राजेंद्र काळे, पोहवा. अजित धुमाळ, पोना. तुषार भिवरकर, पोशि. सुभाष आव्हाड, पोना. अमोल गायकवाड, पोना. अण्णा माने यांनी केलेली आहे.